पान १ वरून

## निवडीनंतरची जबाबदारी मोठी

परिसर अस्वच्छ होतो. तो मद्य पाट्यांचे ठिकाण बनतो. पाण्याची टाकी प्रदूषित होतात. बांधकाम ढासळते. किल्ल्यांचा जीर्णोद्धार हा स्वतंत्र अभ्यासाचा आणि दीर्घकालीन धोरणाचा विषय आहे. युनेस्को जीर्णोद्धाराचे प्रशिक्षण देखील देणार आहे. अनेक सामाजिक संस्था या क्षेत्रात स्वयंस्फूर्त काम करतात. त्यांच्या कामाला शास्त्रोक्त दिशा मिळू शकेल. या सगळ्या कार्यपद्धतीत सरकार ज्येष्ठ गिर्यारोहक आणि सामाजिक संस्थांना सहभागी करून घेईल अशी अपेक्षा. कारण प्रत्येक किल्ल्याची स्थिती आणि भौगोलिक परिस्थिती वेगवेगळी असेल. स्थानिक गरज वेगवेगळ्या असतात. त्यानुसार संवर्धन आणि जीर्णोद्धाराचा आराखडा तयार करावा लागेल. तसा आराखडा कोणत्याही सरकारकडे तयार असतो का? नसतोच बहुधा. अन्यथा, जीर्णोद्धार आकाराला आला असता. जे झाले ते झाले. आता किल्ले जागतिक वारसा झाले आहेत. तो सन्मान टिकवण्याची जबाबदारी सरकारची आणि जनतेची देखील आहे याची खूणगाठ मारलेली बरी.

## उज्ज्वल निकम राज्यसभेवर

धोरणात्मक परराष्ट्र धोरणाला आकार देण्यात त्यांची उल्लेखनीय भूमिका बजावली आहे. अलीकडेच, हर्षवर्धन श्रृंगला भारताच्या जी-२० अध्यक्षपदाच्या काळात मुख्य समन्वयक म्हणून भूमिका बजावली.

डॉ. मीनाक्षी जैन प्राध्यापक असून इतिहासकार म्हणून परिचित आहेत. त्यांनी दिल्ली विद्यापीठाच्या गार्गी कॉलेजमध्ये इतिहास विषय शिकवला. भारतीय सांस्कृतिक वारशावरील त्यांच्या संशोधनकार्याला आंतरराष्ट्रीय स्तरावर मान्यता मिळाली आहे. मीनाक्षी जैन 'सती' 'राम आणि अयोध्या' आणि 'देवतांची उड्डाण' यासारख्या प्रसिद्ध पुस्तकांच्या लेखिका आहेत. २०२० मध्ये मीनाक्षी जैन यांना 'पद्मश्री'ने पुरस्काराने गौरवण्यात आले.

शिक्षणतज्ञ सी. सदानंदन मास्टर हे केरळमध्ये शिक्षण आणि सामाजिक क्षेत्रांत अनेक वर्षांपासून कार्य करीत आहेत. याच क्षेत्रांना त्यांनी आपल्या जीवनाचे ध्येय बनवले. सामाजिक सेवेतील योगदानाचे कौतुक म्हणून मास्टर यांच्या नियुक्तीकडे पाहिले जात आहे.

## डिझेल वाहणाऱ्या मालगाडीला आग

बचावपथकाला पाचारण करण्यात आले. अनेक तासांच्या अथक प्रयत्नांनंतरही आग पूर्णत: आटोक्यात आली नाही. सुदैवाने, या घटनेत कोणतीही जीवितहानी किंवा मोठी वित्तहानी झाल्याचे वृत्त नाही. खबरदारीचा उपाय म्हणून प्रशासनाने स्थानक आणि आसपासचा परिसर रिकामा करण्याचे आदेश दिले आहेत.

या अपघाताचा रेल्वेवाहतुकीवर मोठा परिणाम झाला. दक्षिण रेल्वेने चेन्नईकडे येणाऱ्या आणि जाणाऱ्या अनेक गाड्यांवर तात्पुरते निर्बंध घालण्यात आले. त्यामुळे ८ गाड्या रद्द करण्यात आल्या. ५ गाड्यांचे मार्ग बदलण्यात आले.

### घटनेची चौकशी सुरू

रेल्वे प्रशासनाने आगीच्या घटनेची चौकशी सुरू केली आहे. तथापि आगीचे नेमके कारण अद्याप समजू शकलेले नाही. स्थानिक प्रशासन आणि अग्निशमन दलाचे आग पूर्णत: विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू आहेत. परिस्थिती लवकरच सामान्य होईल, अशी आशा रेल्वेकडून व्यक्त करण्यात आली आहे.

## प्रवासी सुरक्षेसाठी रेल्वेची 'डिजिटल नजर'

आणि डब्यांमध्ये सीसीटीव्हीची यशस्वी चाचणी घेण्यात आली. त्यानंतर रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव यांनी ७४,००० डबे आणि १५,००० इंजिनांमध्ये सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यास मंजुरी दिली. आता प्रत्येक डब्यात ४ डोम-टाईप कॅमेरे बसवले जातील. प्रवेशद्वारावर प्रत्येकी २ आणि प्रत्येक इंजिनात पुढे-मागे आणि दोन्ही बाजूला असे मिळून ६ कॅमेरे लावले जातील. कॅबिनमध्ये (फ्रंट आणि रिअर) एकेक आणि २ डेस्क माऊंट मायक्रोफोन लावले जातील.

### प्रवाशांचे खासगी स्वातंत्र्य जपणार

रेल्वे डब्यांत बसवण्यात येणारे सीसीटीव्ही कॅमेरे केवळ सामान्य ये-जा करणाऱ्या मार्गावर लावले जातील. उदा. डब्याच्या दरवाजाजवळ. यातून प्रवाशांचे खासगी स्वातंत्र्य जपले जाणार असून, त्यांची सुरक्षा वाढली जाणार आहे. हे कॅमेरे १०० कि.मी. प्रतितास किंवा त्याहून अधिक वेगाने धावणाऱ्या गाड्यांमध्येही सुस्पष्ट व्हिडीओ कॅप्चर करतील. कमी उजेडातही ते चालतील, असे असावेत, असे रेल्वेमंत्र्यांनी अधिकाऱ्यांना सांगितले.

## बिहारच्या मतदार यादीत विदेशींची घुसखोरी

निवडणूक आयोगाने विदेशी नागरिकांची नावे अंतिम मतदार यादीत असणार नाहीत, असे स्पष्ट केले आहे. एसआयआरचा उद्देश मतदार याद्यांतून बेकायदेशीर मतदारांना वगळणे हाच आहे. मतदार याद्या पडताळणीला काँग्रेससह सर्वच विरोधी पक्षांकडून विरोध करण्यात येत आहे. त्या पार्श्वभूमीवर मतदार याद्यांबाबतचे वास्तव समोर आल्याने राज्यात खळबळ उडाली आहे.

मतदार याद्या पडताळणीत आढळून आलेली नेपाळ, म्यानमार आणि बांगलादेशांतील नागरिकांची नावे ३० सप्टेंबरला प्रसिद्ध होणाऱ्या अंतिम मतदार यादीतून वगळण्यात येतील. चुकीच्या मार्गाने मतदार ओळखपत्र, आधार आणि इतर कागदपत्रे मिळवणाऱ्या विदेशी घूसखोरांची नावे वगळण्यासाठी त्यांचे जन्मस्थळ तपासले जाणार आहे, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

बिहारमध्ये जारी केलेल्या एसआयआर अंतर्गत ८०.११ टक्के मतदारांनी अर्ज सादर केले आहेत. अर्ज सादर करण्याची प्रक्रिया २५ जुलैपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे, असे आयोगाकडून सांगण्यात आले.

## महामार्गांपेक्षा शहरांतील उपरस्ते 'जीवघेणे'

जनजागृती केली जात आहे. राज्य महामार्गावर रात्री बारा ते चार या वेळेत ऑक्टोबरपर्यंत अवघा एक अपघात झाला आहे. रात्री आठ ते बारापर्यंत पाच अपघात झाले आहेत. राष्ट्रीय महामार्ग आणि शहराअंतर्गत रस्त्यांच्या तुलनेत शहरातील राज्य महामार्गावरील अपघात कमी आहेत. यानुसार शहरांतर्गत वाहतूक विभाग राष्ट्रीय महामार्गावर सुरक्षेसाठी नियोजन करीत आहेत. त्यांनी शहरांतर्गत रस्त्यांवरही सुरक्षेसंदर्भात ठोस उपाययोजनांची आवश्यकता आहे.

### अपघातांच्या वेळा

रस्ते : रात्री १२ ते पहाटे ४ - पहाटे ४ ते ८ - सकाळी ८ ते १२ - दुपारी १२ ते ४ - दुपारी ४ ते रात्री ८ - रात्री ८ ते १२

| | | |
|---|---|---|
| राष्ट्रीय महामार्ग | : | ५ - ७ - ११ - १९ - २८ - २० |
| राज्य महामार्ग | : | १ - २ - ३ - ३ - ५ - ५ |
| इतर रस्ते | : | ८ - ७ - २७ - ३५ - ३६ - ४७ |
| एकूण | : | १४ - १६ - ४१ - ५७ - ६८ - ७२ |

### आठ ते बारादरम्यान जास्त अपघात

पोलिसांच्या मोहिमेमुळे अपघात घटल्याच्या नोंदी असल्या तरी, रात्री आठ ते मध्यरात्री बारा ही वेळ अपघातास कारणीभूत व सर्वात घातकी असल्याचे समोर आले आहे. सन २०२५ मध्ये जानेवारी ते जुलै या सात महिन्यांत शहरात २६८ अपघात झाले. रात्री बारा ते पहाटे चारपर्यंत ७२ अपघात झाले आहेत. वर्दळ सर्वाधिक असते, तेव्हाच भरधाव वेग अथवा नियमबाह्य वाहतुकीमुळे रस्ते अपघात होत आहेत. रात्री आठ ते दहापर्यंत शहरासह महामार्गांवर बऱ्यापैकी वाहनांची संख्या अधिक असते, असे निरीक्षण व नोंदी समोर आल्या आहेत.

## शालेय वाहनांचा पासिंग मेळावा



**नाशिक | प्रतिनिधी**

शिवसेना (ठाकरे गट) महाराष्ट्र वाहतूक सेनेचे उत्तर महाराष्ट्र अध्यक्ष अजीम सय्यद यांच्या विशेष प्रयत्नांनी नाशिकमध्ये २०६ शालेय वाहनांचा पासिंग मेळावा आयोजित करण्यात आला होता.

गेल्या तीन महिन्यांपासून संपूर्ण महाराष्ट्रात शालेय वाहनधारकांच्या स्पीड गव्हर्नरच्या अडचणी संदर्भात बंद असलेले कामकाज संघटनेच्या प्रयत्नामुळे यशस्वीरित्या चालू झाल्याची माहिती यावेळी सय्यद यांनी दिली. मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून शिवसेना ठाकर गटाचे उपनेते दत्ता गायकवाड, उपजिल्हाप्रमुख माजी नगरसेवक असलम भय्या मणियार, गोरख वाघ, जिल्हा सचिव मसूद जिलानी, संजय चिंचोरे, हरिभाऊ काळे, शैलेश सूर्यवंशी, राहील सय्यद आदी उपस्थित होते. या मेळाव्यासाठी नाशिक परिवहन विभागाने सुट्टीच्या दिवशी सर्व अधिकाऱ्यांनी व कर्मचाऱ्यांनी सहकार्य केले. मेळावा यशस्वी करण्यासाठी संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी व सभासदांनी परिश्रम घेतले.

## भात आवणीला वेग...



गेल्या आठवड्यापासून पडत असलेल्या पावसाने तीन दिवसांपासून विश्रांती घेतली. त्यामुळे त्र्यंबक तालुक्यात आवणीच्या कामांना वेग आला आहे. (छाया : सतीश देवगिरे)

## आडगाव ट्रक टर्मिनलचे रखडलेले काम लवकरच पूर्ण

### मनपा आयुक्त खत्री यांचे आश्वासन

**नाशिक | प्रतिनिधी**



आडगाव ट्रक टर्मिनलचे रखडलेले काम लवकरात लवकर मार्गी लावण्यात येईल. तोपर्यंत जकात नाक्याच्या जागेवर ट्रकचालकांना पार्किंगची व्यवस्था करून देण्यात येईल, असे आश्वासन नाशिक महानगर-पालिकेच्या आयुक्त मनीषा खत्री यांनी दिले.

नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या पदाधिकाऱ्यांनी विविध मागण्यांबाबत मनपा आयुक्त मनीषा खत्री यांची भेट घेतली. यावेळी संघटनेच्या वतीने विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले.

यावेळी संघटनेचे अध्यक्ष पी.एम.सैनी, शंकर धनावडे, संजय तोडी, रामभाऊ सूर्यवंशी, सुभाष जांगडा, महेंद्र सिंग राजपूत, विशाल पाठक, कृषन कुमार बेनिवाल, तेजपाल सोढा, महावीर शर्मा, सज्जनसिंग राजपुरोहित, दीपक ढिकले यांच्यासह पदाधिकारी व वाहतूकदार उपस्थित होते.यावेळी नाशिक जिल्हा ट्रान्सपोर्ट असोसिएशनच्या वतीने देण्यात आलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक शहराच्या चारही दिशांना बंद असलेल्या जकात नाक्याच्या जागेवर ट्रक टर्मिनल विकसित करण्यात यावेत. या ट्रक टर्मिनलमधील श्वान निर्बीजीकरण केंद्र बंद करण्यात यावे. ट्रक टर्मिनलमध्ये सारथी सुविधा केंद्र निर्माण करण्यात यावे. पाण्याचा नियमित पुरवठा करण्यात यावा. तसेच व्यापारी गाळे सुरू करण्यात यावे, यासह विविध मागण्या निवेदनाद्वारे करण्यात आल्या.

## शिक्षणासाठी विद्यार्थ्यांमध्ये उत्साह वाढवा : दत्त

**जुने नाशिक | प्रतिनिधी**



शिक्षणाचे महत्व विद्यार्थ्यांना पटवून देऊन सामान्य विद्यार्थ्यांसाठी शिक्षणाचा दर्जा वाढवला पाहिजे. विद्यार्थ्यांचे भविष्यात देशाचे भविष्य उज्ज्वल करतील व भारत देशाला महासत्ता बनवण्याकरता भारताचे विद्यार्थी अग्रेसर राहतील, असे प्रतिपादन महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस व प्रभारी ब्रिजकिशोर दत्त यांनी केले.

नाशिक जिल्हा काँग्रेस अल्पसंख्याक विभागाच्या वतीने रविवारी (दि.१३) गंजमाळ येथील रोटरी हॉलमध्ये दहावी व बारावीत उत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांचा गुणगौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दत्त होते. काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष माजी आ. शिरीष कोतवाल यांनी जिल्ह्यातील अनेक विद्यार्थ्यांनी देश पातळीवर आपले नाव उज्ज्वल केले आहे. स्पर्धा परीक्षांमध्ये नाशिक जिल्हा कायम अग्रेसर असतो, त्यामुळे अशा कार्यक्रमाने विद्यार्थ्यांना उत्साह मिळतो, प्रेरणा मिळते, असे कार्यक्रम वारंवार काँग्रेस पक्षाकडून भविष्यात केली जातील, असे सांगितले. तर विद्यार्थ्यांचा सत्कार केल्यामुळे विद्यार्थ्यांना एक नवीन प्रेरणा मिळते, भविष्यात अल्पसंख्याक विभागाच्या वतीने विविध स्पर्धा परीक्षांसाठी विशेष मार्गदर्शन शिबिरे आयोजित करण्यात येतील, अशी माहिती शहराध्यक्ष अॅड. आकाश छाजेड यांनी दिली. आयोजक तथा अल्पसंख्याक विभागाचे जिल्हाध्यक्ष हाजी तन्वीरखान तांबोळी प्रास्ताविक केले. आसिफ शेख व भालचंद्र पाटील यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. यावेळी जिल्ह्यातील १०० विद्यार्थ्यांसह त्यांच्या पालकांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी माजी नगरसेविका वत्सला खैरे, युवक काँग्रेसचे स्वप्निल पाटील, स्वाती जाधव, संतोष ठाकूर, समाजसेवक नदीम मणियार, सलीम शेख, सलीम तांबोळी, तहसीन मणियार, शब्बीर खाटीक आदी उपस्थित होते.

### स्थानिक भाव

| सोने (प्रति १० ग्रॅम) | |
|---|---|
| २४ कॅरेट | ९८,१०० |
| २२ कॅरेट | ९०,२५० |
| **चांदी (प्रति किलो)** | |
| ११३००० | |

## निर्माल्य कलशाची मागणी

**नवीन नाशिक |** उंटवाडी येथील म्हसोबा महाराज पुलालगत महापालिकेतर्फे ठेवण्यात आलेला निर्माल्य कलश याठिकाणाहून काढण्यात आल्याने पुलावर निर्माल्यासह नागरिक कचरा आणून टाकत असल्याने वाहनचालकांना दुर्गंधीचा सामना करावा लागत. महापालिकेने याठिकाणी त्वरित निर्माल्य कलश ठेवण्याची मागणी वाहनचालकांनी केली आहे.

## श्रीश्याम झुला महोत्सव उत्साहात

### फुलांची सजावट, भजनसंध्या, महापूजेने श्यामभक्त भावविभोर

**नाशिक | प्रतिनिधी**



गंगापूर रोडवरील श्री बालाजी लॉन्स येथे श्रीश्याम सेवक मंडळ, नाशिक व श्री शाम सेवक केंद्र मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने रविवारी (दि. २८) श्री श्याम बाबांचा 'झुला महोत्सव' उत्साहात साजरा करण्यात आला. दुपारी ४.३० पासून रात्री १० पर्यंत रंगलेल्या या कार्यक्रमाला मुंबईसह उत्तर महाराष्ट्रातून हजारो भाविकांनी उपस्थिती लावली.

श्रावण महिन्यात उत्तर भारतीय बांधवांकडून साजरा होणाऱ्या झुला महोत्सवात श्यामबाबांना फुलांनी सजवलेल्या झुल्यावर झुलवण्याची परंपरा आहे. यंदा महोत्सवासाठी खास कोलकात्याहून मागवलेल्या १,००० जुई फुलांसह विविध नैसर्गिक फुलांची आकर्षक सजावट करण्यात आली होती. सजावटीतून श्यामबाबांच्या दरबाराला एक अनुपम दिव्यता लाभली.

महोत्सवात आयोजित भजन संध्येत मुंबईचे प्रसिद्ध भजनसम्राट साकेत बोरोलिया, राकेश बावलिया, प्रदीप बगडिया, विनिता बाजोरिया तसेच नाशिकचे सुरेश पारीक यांच्यासह मुंबई येथील गणेश म्युझिकल ग्रुप व श्याम सेवा समितीच्या भजन गायकांनी सादर केलेल्या भजनी कार्यक्रमांनी वातावरण भक्तिरसात न्हालें. महाआरतीनंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमासाठी श्री श्यामसेवक मंडळाचे संस्थापक ललित रुंठा, अध्यक्ष नरेश काबरा, पंकज परशुरामपुरिया, सुशील केडिया, किशोर संघई, दिलीप बगडिया, पवन शर्मा, जुगल देवडा, सुरेश पारीक, कमल टिबडेवाल, महेंद्र पोद्दार, अंकित अग्रवाल, अमित अग्रवाल, संजय कारीवाल, किरण अग्रवाल, रवींद्र केडिया, आनंद अग्रवाल, कुशल सोनी, विक्रांत चांदवडकर, प्रमोद परशुरामपुरिया आदींसह श्याम भक्तांनी विशेष परिश्रम घेतले. बालाजी लॉन्सचे संचालक राजेंद्र आहेर यांनी लॉन्स विनामूल्य उपलब्ध करून देत मोलाचा सहभाग दिला.

## स्वामी समर्थ केंद्रात शिवसेनेचा कार्यक्रम

**नाशिकरोड | प्रतिनिधी**

गुरुपौर्णिमेच्या पवित्र आणि आध्यात्मिक निमित्ताने प्रभाग क्रमांक २० मधील शिखरेवाडी येथील श्री स्वामी समर्थ केंद्रात शिवसेनेच्या वतीने विविध धार्मिक व महाप्रसादाचे कार्यक्रम आयोजित करण्यात आले होते.

कार्यक्रमाचे आयोजन शिवसेना सहसंपर्कप्रमुख गणेश कदम, सुप्रिया कदम यांच्या वतीने करण्यात आले. परिसरातील हजारो भाविकांनी या उत्सवात सहभाग घेऊन श्री स्वामी समर्थांचे दर्शन घेतले आणि महाप्रसादाचा लाभ घेतला. पहाटेपासूनच केंद्रात भक्तांचा ओघ सुरू झाला होता. कार्यक्रमाची सुरुवात पंचामृत अभिषेक, गुरुपूजन आणि आरतीने झाली. स्थानिक सेवेकरांनी गुरुमहिमा सांगणारे अभंग, ओव्या आणि भक्तिगीते सादर करत भाविकांना भावविश्वात रंगवले.

शिवसेना सहसंपर्कप्रमुख गणेश कदम यांनी यावेळी बोलताना सांगितले की, गुरुपौर्णिमा ही आपल्या अध्यात्मिक संस्कृतीत गुरूप्रती कृतज्ञता व्यक्त करण्याचा दिवस आहे. स्व. राजाभाऊ कदम सार्वजनिक वाचनालयाचे अध्यक्षा सुप्रिया कदम यांनी भावनिक शब्दांत म्हटले की, गेल्या काही वर्षांपासून आम्ही या उपक्रमात सातत्य ठेवले आहे. समाजात सकारात्मक ऊर्जा, भक्ती आणि एकात्मतेचा संदेश देणे हेच आमचे उद्दिष्ट आहे.

कार्यक्रमाला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शिवसेना पक्षाचे पदाधिकारी यश बच्छाव, आशिष भोळे, सिद्धेश विसपुते, नीलेश गुंजाळ, किशोर वडजे, प्रसन्न कदम, भागवत काका, जमदडे, प्रवीण वाघ, संजय बर्वे, राहुल साळवे, पल्लवी वाघ, श्री स्वामी समर्थ केंद्रातील पदाधिकारी यांनी विशेष मेहनत घेतली.



## नंदिनी नदीचे संवर्धन करा; निसर्गसेवक युवा मंचची मागणी

**नवीन नाशिक |** गोदावरी नदीच्या शुद्धतेसाठी तिच्या उपनदी नंदिनीच्या संरक्षणाची मागणी करत निसर्गसेवक युवा मंचने नाशिक पश्चिमच्या आ. सीमा हिरे यांना निवेदन सादर केले.

संघटनेचे अध्यक्ष अमित कुलकर्णी यांच्या नेतृत्वाखालील प्रतिनिधीमंडळाने हे निवेदन दिले. निवेदनात म्हटले आहे की, नंदिनी नदी सध्या सांडपाणी, औद्योगिक कचरा आणि अतिक्रमणामुळे गंभीर प्रदूषणाच्या विळख्यात सापडली आहे. या प्रदूषित पाण्याचा गोदावरी नदीवर प्रतिकूल परिणाम होत असून, आध्यात्मिक समतोलावरही धोका निर्माण झाला आहे. गोदावरी नदीचे पावित्र्य केवळ स्थानिक श्रद्धेपुरते मर्यादित नसून, कुंभमेळ्यासारख्या जागतिक ख्यातीच्या धार्मिक सोहळ्याशी तिचा थेट संबंध आहे. या पवित्र संगमात नंदिनी नदीचे प्रदूषित पाणी मिसळल्याने गोदावरीच्या पावित्र्यावर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. त्यामुळे नंदिनीचे संवर्धन हे केवळ पर्यावरणीय नव्हे, तर धार्मिकदृष्ट्याही अत्यंत आवश्यक आहे. यावेळी भारतीय जनता पक्ष नवीन नाशिक मंडल अध्यक्ष वैभव महाले, सरचिटणीस अशोक पवार, माजी नगरसेविका अलका आहिरे , हर्षदा गायकर आदी उपस्थित होते.